मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | » पुणे, पिंपरी-चिंचवड | » बुधवार, दि. 17 डिसेंबर 2025 | पान- 1

# अजित पवारांचा भाजपा, ठाकरे गटाला 'दे धक्का'!

## भाजपच्या माजी स्थायी समिती अध्यक्षा सीमा सावळे यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**पिंपरी | प्रतिनीधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवड शहर भाजपला मोठा धक्का दिला आहे. स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा आणि आक्रमक नगरसेविका अशी ओळख असलेल्या सीमा सावळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. याबरोबर शिवसेना (शिंदे) पक्षाचे खासदार श्रीरंग बारणे यांचे विश्वासू असलेले आकुर्डीचे माजी नगरसेवक प्रमोद कुटे यांनीही राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे.




महापालिका निवडणुकीसाठी आचारसंहिता जाहीर झाल्यानंतर अजित पवार यांनी दुसऱ्याचदिवशी पुण्यात पिंपरीतील इच्छुकांच्या मुलाखती घेण्यास सुरुवात केली आहे. महापालिकेत सत्ता आणण्यासाठी सर्वस्व पणाला लावणार असल्याचे पवार यांनी सांगितले आहे. त्यांनी भाजप, दोन्ही शिवसेनेला धक्के देण्यास सुरुवात केली आहे.

स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा आणि आक्रमक नगरसेविका अशी ओळख असलेल्या सीमा सावळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. सावळे या तीनवेळा महापालिकेत निवडून आल्या आहेत. दोनवेळा शिवसेनेकडून आणि भाजपकडून एकवेळेस निवडून आल्या आहेत.

महापालिकेत २०१७ मध्ये भाजपची सत्ता आणण्यात सावळे यांचेही योगदान मानले जाते. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सत्ताकाळातील महापालिकेतील चुकीच्या कामांविरोधात रान पेटविले होते. कथित भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठविला होता. महापालिकेत भाजपची सत्ता आल्यानंतर २०१७ मध्ये पहिल्यांदाच त्यांना स्थायी समितीचे अध्यक्षपद देण्यात आले होते. परंतु, कालांतराने त्यांचे भाजप नेतृत्वाशी सूर जुळले नाहीत. त्यातूनच त्यांनी २०१९ ची विधानसभेची निवडणूक अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर विधानसभा मतदारसंघातून अपक्ष लढविली होती. आता सावळे यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. सावळे यांच्या प्रभाग क्रमांक आठ इंद्रायणीनगरमधून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेले शिवसेना (ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी तुषार सहाने यांनीही राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला आहे. याबरोबर शिवसेना (शिंदे) पक्षाचे खासदार श्रीरंग बारणे यांचे विश्वासू असलेले आकुर्डीचे माजी नगरसेवक प्रमोद कुटे यांनीही राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. कुटे यांचा राष्ट्रवादीतील प्रवेश खासदार बारणे यांच्यासाठी धक्का मानला जात आहे.

जाधववाडीमधील भाजपच्या माजी नगरसेवक अश्विनी जाधव, आकुर्डीतील शिवसेनेचे (शिंदे) माजी नगरसेवक प्रमोद कुटे, शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या महिला संघटिका रुपाली आल्हाट, शिवसेनेचे उपशहरप्रमुख नेताजी काशीद यांनी मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात प्रवेश केला. 'प्रभागात काम करित असताना अनेक अडचणी आल्या. दबाव टाकून कामे थांबविण्याचा प्रयत्न केला. अजित पवार यांचे काम आवडते. जागेवर काम मार्गी लावतात. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (अजित पवार) प्रवेश केला असल्याचे या सर्वांनी सांगितले.

---

# पिंपरी-चिंचवडमध्ये 17 लाख 13 हजार मतदार बजाविणार मतदानाचा हक्क!

## महिला मतदारांची संख्या 8 लाखांच्या पुढे, 32 प्रभागांत निवडणूक रणधुमाळी, अंतिम यादी जाहीर

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठीची अंतिम मतदार यादी जाहीर झाली असून, शहरातील ३२ प्रभागांमध्ये एकूण १७ लाख १३ हजार ८९१ मतदार नोंदले गेले आहेत. यामध्ये ९ लाख ५७ हजार ७२८ पुरुष, ८ लाख ७ हजार ९६६ महिला, तर १९७ इतर मतदारांचा समावेश आहे. वाढती मतदारसंख्या लक्षात घेता आगामी निवडणुकीत चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे.

प्रभागनिहाय आकडेवारी पाहता प्रभाग क्रमांक १६ मध्ये सर्वाधिक ७५ हजार १०५ मतदार असून, तो शहरातील सर्वात मोठा प्रभाग ठरला आहे. यानंतर प्रभाग क्रमांक ३ (७२ हजार १०६) आणि प्रभाग क्रमांक २ (६९ हजार ५१८) या प्रभागांतही मोठ्या प्रमाणावर मतदार आहेत. दुसरीकडे प्रभाग क्रमांक २३ मध्ये सर्वात कमी ३३ हजार ३३ मतदार नोंदले गेले आहेत.महिला मतदारांची संख्या अनेक प्रभागांमध्ये लक्षणीय असल्याचे चित्र आहे. काही प्रभागांत महिला मतदारांचे प्रमाण पुरुषांच्या जवळपास पोहोचले असून, याचा थेट परिणाम उमेदवारांच्या प्रचारावर आणि मुद्द्यांच्या निवडीवर होणार आहे. तसेच इतर (तृतीयपंथी) मतदारांची नोंदही जवळपास सर्व प्रभागांमध्ये असल्याने समावेशक लोकशाहीचे चित्र दिसून येत आहे.




अंतिम मतदार यादी जाहीर झाल्याने आता राजकीय हालचालींना वेग आला आहे. प्रत्येक प्रभागातील मतदारसंख्या लक्षात घेऊन पक्षांकडून रणनीती आखली जात असून, स्थानिक प्रश्न, नागरी सुविधा आणि विकासकामे हे प्रचाराचे केंद्रबिंदू ठरण्याची शक्यता आहे. वाढलेल्या मतदारसंख्येमुळे यंदाची महानगरपालिका निवडणूक अधिक निर्णायक आणि उत्सुकतेची ठरणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात आलेल्या महापालिका सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी २३ डिसेंबर २०२५ ते ३० डिसेंबर २०२५ पर्यंत कालावधी देण्यात आला असून पारंपरिक (ऑफलाईन) स्वरूपात नामनिर्देशन पत्र स्वीकारले जाणार आहे. प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी ३१ डिसेंबर २०२५ रोजी होणार असून उमेदवारी माघारीसाठी २ जानेवारी २०२६ ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. चिन्ह वाटप आणि अंतिम उमेदवारांची यादी ३ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. तर १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे.

### 32 प्रभाग 128 जागा..

» पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी बहुसदस्यीय पद्धतीने निवडणूक राबवली जाणार असून चार सदस्यीय प्रभागरचना असणार आहे. एकूण ३२ प्रभागांमधून १२८ जागांसाठीची निवडणूक आहे. प्रत्येक उमेदवारासाठी १३ लाख रुपये इतकी खर्चाची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. प्रत्येक मतदाराला ४ मते देण्याचा अधिकार असणार आहे. महापालिका कार्यक्षेत्रात एकूण मतदारांची संख्या सुमारे १७ लाख १३ हजार ८९१ इतकी आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ९ लाख ५ हजार ७२८ तर स्त्री मतदारांची संख्या ८ लाख ७ हजार ९६६ इतकी आहे. तर इतर मतदारांची संख्या १९७ इतकी आहे. निवडणुकीसाठी २ हजार ४४ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. निवडणुकीसाठी ८ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# नि:पक्षपातीपणे कामकाज करा; आयुक्त श्रावण हर्डीकर

## महापालिका निवडणूक 2025-26 साठी प्रशासन सज्ज; आयुक्त हर्डीकरांचे अधिकाऱ्यांना आदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक कामासाठी नियुक्त सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी परस्पर उत्तम समन्वय ठेवून आपली जबाबदारी पार पाडावी. राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या नियमावलीनुसार अत्यंत जबाबदारीने पारदर्शक आणि नि:पक्षपातीपणे निवडणूक प्रक्रिया पार पाडावी, अशा सूचना आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी दिल्या.



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह येथे महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने आढावा बैठक आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली,त्यावेळी ते बोलत होते.

या आढावा बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उप जिल्हाधिकारी अनिल पवार, अर्चना पठारे, पल्लवी घाटगे, किरणकुमार काकडे, सुरेखा माने, हिम्मत खराडे, सुप्रिया डांगे, दीप्ती सूर्यवंशी, हनुमंत पाटील, सह आयुक्त मनोज लोणकर, उपायुक्त सचिन पवार, संदीप खोत, अतुल पाटील, डॉ. चेतना केरुरे, व्यंकटेश दुर्वास, स्मार्ट सिटीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी किरण राज यादव, सहाय्यक आयुक्त अतुल पाटील, अजिंक्य येळे, क्षेत्रीय अधिकारी पूजा दुधनाळे, निवेदिता घार्गे, तानाजी नरळे, राजाराम सरगर, अश्विनी गायकवाड, नायब तहसीलदार स्वाती गायकवाड, गौरी तेलंग, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता शिवराज वाडकर, दिलीप भोसले, वैशाली ननावरे, चंद्रकांत मुठाळ, सुनील शिंदे, शिवाजी चौरे, विजय सोनवणे, हेमंत देसाई, सतीश वाघमारे, सोहम निकम, सुर्यकांत मोहिते, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह निवडणूक कामकाजासाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त हर्डीकर म्हणाले, प्रत्येक प्रभागातून ४ उमेदवार निवडून द्यायचे असून, प्रत्येक मतदाराला ४ उमेदवारांना मतदान करण्याचा अधिकार असणार आहे. याच पद्धतीने ईव्हीएमची रचना आणि इतर तांत्रिक बाबींचे नियोजन असणार आहे. मतदानाच्या दुसऱ्याच दिवशी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार असल्याने त्यादृष्टीने नियोजन करणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया सर्वांसाठी अत्यंत संवेदनशील असणार असून शहरात सुमारे १७ लाख मतदार असून त्यांच्या नियोजनासाठी ८ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालये निश्चित करण्यात आली आहेत. कामात सुसूत्रता आणण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावर योग्य मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

मतदारांच्या सोयीसाठी नव्याने काही मतदान केंद्रांची उभारणी करण्यात येणार आहे. प्रभागातील मतदान केंद्र त्याच प्रभागात राहतील याची काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच गर्दीच्या ठिकाणी पोलिसांशी समन्वय साधून गर्दीचे नियोजन व कायदा-सुव्यवस्था राखली जावी. दिव्यांग आणि वृद्ध मतदारांसाठी मतदान केंद्रांवर योग्य त्या सुविधा उपलब्ध करून देणे, संवेदनशील व आदर्श मतदान केंद्रे निश्चित करणे आणि मतदान साहित्याची गुणवत्ता तपासणे या बाबींकडे बारकाईने लक्ष देणे गरजेचे आहे. मतमोजणीसाठी जागा अपुरी पडत असल्यास शाळा, कॉलेज किंवा मंगल कार्यालयांची पाहणी करून त्या ठिकाणी मतदान केंद्रे स्थलांतरित करण्याची सोय करावी, अशा सूचना आयुक्त हर्डीकर यांनी यावेळी दिल्या.

याशिवाय, मतदार याद्यांबाबत आलेल्या सुमारे १ लाख तक्रारींचा निपटारा करण्यात आला असून, चुकीच्या प्रभागात नावे असल्याच्या तक्रारी दूर करण्यात आल्या आहेत. दुबार मतदारांची पडताळणी प्रभाग स्तरावर सुरू असून हे काम २७ तारखेपर्यंत पूर्ण करून त्याच दिवशी मतदान केंद्रनिहाय याद्या प्रसिद्ध करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ही निवडणूक प्रक्रिया संवेदनशील असल्याने सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सतर्क राहून आपल्या स्तरावर निवडणूकीचे सूक्ष्म नियोजन करावे. कोणतीही अडचण आल्यास वरिष्ठांचे मार्गदर्शन घेऊन सर्व कामकाज प्रामाणिकपणे व जबाबदारीने पूर्ण करावे, असे निर्देश देखील आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी यावेळी दिले.

बैठकीत निवडणूक विभागाचे उप आयुक्त सचिन पवार यांनी सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना महापालिका निवडणूक कार्यक्रमाची संगणकीय सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती दिली.

# महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने 4 हजार 819 अनधिकृत फ्लेक्सवर कारवाई

## आदर्श आचारसंहितेचे पालन करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मोहीम

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा राज्य निवडणूक आयोगाकडून १५ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आली असून निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या पार्श्वभूमीवर आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी महापालिका कार्यक्षेत्रात आज (१६ डिसेंबर) दुपारी ३ वाजेपर्यंत ४ हजार ८१९ नियमबाह्य तसेच अनधिकृतपणे लावण्यात आलेले राजकीय फ्लेक्स, बॅनर्स, किऑस्क, स्टिकर्स, होर्डिंग, चिन्हे, ध्वज, फलक, भिंतीवरील राजकीय जाहिराती आदी तद्सम बाबी हटविण्यात आल्या आहेत. महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या वतीने ही कारवाई सुरू करण्यात आली आहे.





निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचना आणि आदेशांचे पालन करण्यासाठी महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. शहरातील प्रमुख चौक, मुख्य रस्ते, सार्वजनिक ठिकाणे तसेच शासकीय इमारतींच्या परिसरात लावण्यात आलेले अनधिकृत, नियमबाह्य जाहिरात फलक, फ्लेक्स आदी तद्सम बाबी हटविण्याची मोहीम युद्धपातळीवर राबविण्यात येत आहे. ही कारवाई करताना संबंधित राजकीय पक्ष, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी महापालिकेला सहकार्य करावे, तसेच पुढील काळात कोणत्याही स्वरूपात आचारसंहितेचा भंग होईल असे साहित्य लावू नये, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

> “ निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता आणि समतोल राखण्यासाठी आचारसंहितेची अंमलबजावणी अत्यंत महत्त्वाची आहे. कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रभाव टाळण्यासाठी प्रशासनाने वेळेत प्रतिबंधात्मक उपाय राबविले असून, सर्वांनी नियमांचे पालन करणे अपेक्षित आहे.
>
> **– श्रावण हर्डीकर, आयुक्त तथा निवडणूक अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका.**

> “ निवडणूक आचारसंहिता लागू झाल्यानंतर शहरात कुठेही राजकीय स्वरूपाचे जाहिरात फलक, होर्डिंग किंवा फ्लेक्स राहू नयेत, यासाठी कारवाई सुरू करण्यात आली आहे. आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घेऊन तातडीने ही कारवाई करण्यात येत असून, पुढील काळातही यात सातत्य सुरू राहणार आहे.
>
> **– राजेश आगळे, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

# पुणे महापालिका निवडणूक प्रक्रियेला सुरुवात

## राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार आचारसंहिता व खर्च तपासणी कक्षही सक्रिय

**पुणे | प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या 2025-26 या सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया अधिकृतपणे सुरू झाली असून, राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार निवडणूक निर्णय अधिकारी, आचारसंहिता कक्षप्रमुख तसेच उमेदवारांच्या निवडणूक खर्चाच्या तपासणीसाठी कक्षप्रमुखांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. महापालिका प्रशासनाने दिलेल्या निर्देशानुसार सर्व नियुक्त निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी 16 डिसेंबर 2025 रोजी दुपारी 3 वाजेपर्यंत आपल्या नियुक्तीच्या ठिकाणी हजर राहून त्याचा अनुपालन अहवाल सादर करणे बंधनकारक आहे.

शहरातील एकूण 41 प्रभागांची विभागणी 15 प्रशासकीय विभागांमध्ये करण्यात आली असून, या विभागांसाठी विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत 15 निवडणूक निर्णय अधिकारी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यानुसार शहर निवडणूक अधिकारी तथा पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी उपजिल्हाधिकारी व समकक्ष वर्ग-1 दर्जाच्या 15 अधिकाऱ्यांची विविध प्रभागांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

येरवडा-धानोरी, शिवाजीनगर-घोलेरोड, औंध-बाणेर, कोथरूड-बावधन, हडपसर-मुंढवा, वानवडी-रामटेकडी, बिबवेवाडी, भवानी पेठ, कसबा-विश्रामबागवाडा, वारजे-कर्वेनगर, सिंहगड रोड, धनकवडी-सहकारनगर, कोंढवा-येवलेवाडी आदी विभागांतील संबंधित सहायक महापालिका आयुक्त कार्यालयांमध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची कार्यालये कार्यरत राहणार आहेत.




नियुक्त अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, निवडणूक नियमावली तसेच राज्य निवडणूक आयोग व शहर निवडणूक अधिकाऱ्यांच्या सूचनांनुसार निवडणूक कामकाज पार पाडावे, असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत.


निवडणूक प्रक्रियेत पूर्णतः निःपक्षपाती भूमिका ठेवण्याच्या ठाम सूचना देण्यात आल्या असून, कोणत्याही प्रकारच्या पक्षपाती वर्तनाबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

# विशाल अग्रवालला हायकोर्टाचा झटका, जामीन फेटाळला

## पोर्शे कार अपघात प्रकरणातील अल्पवयीन मुलाचा बाप दीडवर्षांहून अधिक काळापासून कारागृहात

**पुणे | प्रतिनिधी**

संपूर्ण राज्याला हादरवणाऱ्या पुण्यातील कल्याणीनगर भागात झालेल्या पोर्शे कार अपघात प्रकरणातील आरोपी विशाल अग्रवाल याचा जामीन अर्ज उच्च न्यायालयाने पुन्हा एकदा फेटाळला आहे. विशाल अग्रवाल याचा अल्पवयीन मुलाने दोन तरुण अभियंत्यांना चिरडले होते. त्याचा बचाव करण्यासाठी बांधकाम व्यावसायिक असणाऱ्या अगरवाल याने वैद्यकीय अहवालात छेडछाड केल्याचं निदर्शनास आलं होतं. गेल्या 17 महिन्यांपासून तो कारागृहात आहेत. तसेच या प्रकरणातील अल्पवयीन तरुणाचे रक्ताचे नमुने बदलल्याप्रकरणी डॉ.अजय तावरे याचाही जामीन न्यायालयाने फेटाळला आहे.





कल्याणीनगरमध्ये १९ मे २०२४ एका पबमधून बाहेर पडलेल्या मद्यधुंद अल्पवयीन मुलाने भरधाव वेगात पोर्शे कार चालवून केलेल्या अपघातात दोन तरुण अभियंत्याना जीव गमवावा लागला होता. या प्रकरणात शहरातील एका बड्या उद्योगपतीच्या अल्पवयीन मुलाला पोलिसांनी ताब्यात घेतले. या प्रकरणाच्या तपासात अनेक सुरस गोष्टी उलगडत गेल्या मद्यधुंद युवकाचे रक्ताचे नमुने रुग्णालयात बदलण्यात आले. मद्यप्राशन केलेल्या मुलाचे रक्ताचे नमुने बदलण्यासाठी कारचालक आरोपी मुलाचा बाप असलेल्या विशाल अगरवालने कारस्थान रचले होते. मुलाऐवजी त्याच्या आईच्या रक्ताचे नमुने तपासणीला पाठवण्यात आले होते. या प्रकरणी 21 मे 2024 रोजी विशाल अगरवाल याला पुणे पोलिसांनी छत्रपती संभाजीनगरमधून अटक केली होती.

### दोन पोलिस अधिकारी सेवेतून बडतर्फ

» पोलिसांनी मद्यधुंद युवकाला व त्याच्या साथीदारांना ताब्यात घेतले होते. त्यांच्यासाठी पोलीस ठाण्यात पिझ्झा व तत्सम खाद्यपदार्थ एका लोकप्रतिनिधीच्या सांगण्यावरून पाठवण्यात आले. प्राथमिक टप्प्यात पोलिसांनी ढिसाळ तपास केला होता. रक्तामध्ये मद्याचा व अमली पदार्थांचा अंश सापडू नये यासाठी हेतूतः रक्ताची चाचणी विलंबाने करण्यात आली. तसेच ससून रुग्णलयातील डॉक्टरांशी आर्थिक व्यवहार करून रक्ताचे नमुने बदलण्यात आले अशी धक्कादायक माहिती तपासात पुढे आली. पोर्शे कार अपघात प्रकरणात झालेल्या गंभीर चुकांकडे लक्ष वेधत महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक रश्मि शुक्ला यांनी नुकतेच चार पोलिसांवर कठोर शिस्तभंगाच्या शिक्षेचे आदेश दिले आहेत.या कारवाईमुळे प्रकरणातील पोलिसांच्या भूमिकेबाबत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. पोलीस निरीक्षक राहुल मुरलीधर जगदाळे आणि सहायक पोलीस निरीक्षक विश्वनाथ महादेव तोडकरी यांना शासन सेवेतून बडतर्फ करणे ही शिक्षा कायम करण्यात आली आहे.

# पुणे महापालिका निवडणुक महाविकास आघाडी एकत्रच लढणार

## महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला रोखण्यासाठी महाविकास आघाडीत सहभागी

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेची आगामी निवडणूक महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार ) आणि शिवसेना (ठाकरे) पक्षाने एकत्रित लढविण्याचा निर्णय घेतला आहे. महाविकास आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांशी याबाबत चर्चा करण्यात आली असून, त्यांनी दिलेल्या आदेशानंतर महापालिका निवडणूक एकत्रित लढविण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले.




महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या तिन्ही पक्षांच्या शहरातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांची प्राथमिक बैठक सोमवारी शहर काँग्रेसच्या कार्यालयात झाली. त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला. महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला रोखण्यासाठी महाविकास आघाडीत सहभागी असलेल्या तिन्ही पक्षांनी एकत्र येणे गरजेचे आहे. त्यासाठी हा निर्णय घेण्यात आला.

भाजपविरोधातील लढाई लढण्यासाठी इतर समविचारी पक्षांनाही सोबत घेण्याबाबत या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. काँग्रेसचे प्रभारी शहराध्यक्ष अरविंद शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, शिवसेना (ठाकरे) पक्षाचे शहराध्यक्ष संजय मोरे, गजानन थरकुडे या वेळी उपस्थित होते.

गेल्या आठ वर्षांमध्ये पुणेकरांवर अन्याय करणाऱ्या आणि महापालिकेच्या तिजोरीची स्वत:च्या स्वार्थासाठी लूट करणाऱ्या भाजपसह महायुतीमधील पक्षांना सत्तेपासून दूर करण्यासाठी राजकीय पक्षांनी एकत्रित येऊन निवडणूक लढवावी, अशी चर्चा या बैठकीत करण्यात आली. शिंदे म्हणाले, 'अधिकाधिक नगरसेवक निवडून आणत महापालिकेवर महाविकास आघाडीचा झेंडा कसा रोवता येईल, याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

मागील आठ वर्षांत पुण्याचा विकास थांबला असून भ्रष्टाचाराने माखलेल्या भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी महाविकास आघाडी कटिबद्ध आहे. स्थानिक पातळीवर परिस्थितीनुसार कोणाला सोबत घ्यायचे याचा निर्णय घ्यावा, असे प्रदेश काँग्रेसने सांगितले आहे. भाजपविरोधात लढण्यासाठी तयार असलेल्या सर्व पक्षांची एकजूट करण्यावर आमचे एकमत झाले आहे.'

राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे प्रशांत जगताप म्हणाले, 'महापालिकेच्या निवडणुकीत भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी समविचारी पक्षांना सोबत घेण्याबाबत चर्चा सुरू आहे. उमेदवारी देताना कोणत्या पक्षाला किती आणि कोणत्या जागा द्यायच्या हे ठरविण्यासाठी पुढील दोन ते तीन दिवसात बैठक होईल. गेल्या निवडणुकीत दुसऱ्या क्रमांकावर कोण उमेदवार होता, तसेच तिन्ही पक्षांचा संयुक्त जाहीरनामा कसा असेल, यावर बैठकीत चर्चा करण्यात येणार आहे.

भाजपने हजारो कोटींचा भ्रष्टाचार केला असून पुणे शहराला वेठीस धरले आहे. शहरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. भ्रष्टाचार आणि गुन्हेगारीच्या बाबतीत पुण्याचा देशात अव्वल क्रमांक लागला आहे. पुण्याच्या हितासाठी आणि संरक्षणासाठी महाविकास आघाडी म्हणून एकत्र लढण्याचा आमचा निर्धार आहे!महापालिकेची आगामी निवडणूक कशी लढायची? याची रणनीती आखली जाईल.

भाजपचा रथ लोकहिताचा नसून स्वहिताचा आहे. तो कसा रोखायचा, यावर चर्चा केली जाईल. गेल्या निवडणुकीत ज्या जागा लढविल्या, जिंकल्या किंवा दुसऱ्या क्रमांकावर राहिलो, त्याची कागदपत्रांनिशी चर्चा करून त्यानंतर जागावाटपाचे निर्णय घेतले जातील. भाजप वगळता इतर सर्व पक्षांना एकत्र आणण्याचा महाविकास आघाडीचा विचार आहे, असे शिवसेना (ठाकरे) पक्षाचे संजय मोरे, गजानन थरकुडे यांनी सांगितले.

### मनसेचा निर्णय राज्य पातळीवरून

» **भाजप आणि महायुतीत सहभागी असलेल्या पक्षांचा महापालिकेच्या निवडणुकीत पराभव करण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला महाविकास आघाडीत सहभागी करून घ्यायचे की नाही? याचा निर्णय राज्य पातळीवरील नेत्यांच्या बैठकीत होणार आहे. मनसेने घेतलेल्या भूमिका काही ठिकाणी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना अडचणीमध्ये आणणाऱ्या आहेत. मनसेच्या सहभागाबाबतचा निर्णय वरिष्ठ पातळीवर होईल, असेही या वेळी स्पष्ट करण्यात आले.**

# तळेगाव एमआयडीसीत उभारणार 550 कोटींचा लॉजिस्टिक पार्क

## वेल्स्पन वनची मोठी गुंतवणूक; 46 एकरांवर 12 लाख चौरस फूट प्रीमियम वेअरहाऊसिंग प्रकल्प

**पुणे | प्रतिनिधी**

देशातील आघाडीचे औद्योगिक केंद्र असलेल्या पुण्यातील गुंतवणुकीचा ओघ कायम आहे. पुण्यात आता निर्मिती क्षेत्रासोबत आता लॉजिस्टिक क्षेत्रात गुंतवणूक सुरू झाली आहे. देशातील आघाडीचा वेअरहाऊसिंग आणि औद्योगिक रिअल इस्टेट प्लॅटफॉर्म असलेल्या वेल्स्पन वनला पुण्यातील तळेगाव औद्योगिक क्षेत्रात (एमआयडीसी) लॉजिस्टिक उभारण्याची घोषणा केली आहे.



वेल्स्पन कंपनीकडून तळेगाव एमआयडीसीतील चौथ्या टप्प्यातील ४६ एकर जागेवर लॉजिस्टिक पार्क उभारण्यात येणार आहे. यासाठी सुमारे ५५० कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. हा लॉजिस्टिक पार्क सुमारे १२ लाख चौरस फूट जागेवर विकसित करणार आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) अधिसूचित केलेल्या या जमिनीचा वापर प्रीमियम ग्रेड-ए फर्स्ट-माइल लॉजिस्टिक्स मालमत्ता विकसित करण्यासाठी होणार आहे. या अंतर्गत कारखान्यापासून वितरण साखळीपर्यंत वस्तूंची वाहतूक सक्षम केली जाईल. धोरणात्मकदृष्ट्या तळेगाव-चाकण पट्ट्यात असलेले हे ठिकाण देशातील सर्वात महत्त्वाच्या औद्योगिक आणि गोदाम बाजारपेठेतील मध्यवर्ती ठिकाणी आहे. गोदाम आणि औद्योगिक ठिकाणासाठी महत्त्वाच्या आवश्यक पायाभूत सुविधा तसेच मुख्य भागापासून जवळ असणे, हे निकष हे ठिकाण पूर्ण करते.

### तळेगाव-चाकण पट्ट्याला सर्वाधिक पसंती

या धोरणात्मक निर्णयामुळे वेल्स्पन वनचा पुण्यातील लॉजिस्टिक बाजारपेठेत प्रवेश झाला आहे. या निमित्ताने कंपनीची महाराष्ट्राच्या आधुनिक वेअरहाऊसिंग कॉरिडॉरमध्ये उपस्थिती अधिक भक्कम झाली आहे. पुण्यात यंदा अंदाजे ७४ लाख चौरस फूट गोदाम भाडेपट्ट्याची नोंद झाली. गेल्या वर्षीच्या याच कालावधीतील ती ६८ लाख चौरस फूट होती.

### मोक्याचे ठिकाण

» **वेलस्पन वनच्या लॉजिस्टिक पार्कशेजारी ४५ मीटर रुंदीचा एमआयडीसीचा मुख्य रस्ता प्रस्तावित आहे. तसेच, महत्त्वाचे म्हणजे एमआयडीसीसाठी तीन बाजूंनी होणाऱ्या प्रवेश रस्त्यांचा फायदा होणार आहे. आगामी वर्तुळाकार मार्गापासून हे ठिकाण फक्त १० किलोमीटर आणि मुंबई-पुणे द्रुतगती मार्गापासून ११ किलोमीटरवर अंतरावर आहे. यामुळे पुणे, मुंबई, नाशिक आणि पश्चिम महाराष्ट्र अशा वैविध्यपूर्ण ठिकाणांशी भौगोलिकदृष्ट्या जलद दळणवळण शक्य होणार आहे. तळेगाव एमआयडीसीपासून हे ठिकाण १० मिनिटांपेक्षाही कमी अंतरावर आहे. त्यामुळे तळेगाव एमआयडीसीतील उद्योगांचा याचा मोठा फायदा होणार आहे.**